टिपण :

# प्रामाण्यवाद आणि विज्ञान

अपौरुषेय शब्द असू शकतो असे (बहुधा) आपण कोणीच मानत नाही. आणि पौरुषेय शब्दाच्या प्रामाण्याच्या विचाराचा समावेश अनुमानाच्या प्रामाण्य-विचारात होतो. म्हणून शब्दप्रमाण सोडून देऊ. अनुमान हे परोपजीवी प्रमाण आहे. त्यातील आधारविधाने यथार्थ असतील आणि अनुमान-प्रक्रिया निर्दोष असेल तर निष्कर्ष या रीतीने प्राप्त होणारे नवीन ज्ञान हे स्वतःप्रमाण असते याविषयी मतभेद होणार नाहीत. पर्वतावर धूर आहे हे मान्य आहे, धूर हे आणि अग्नी यांच्यात व्याप्त-व्यापक संबंध आहे हेही मान्य आहे; तरीपण पर्वतावर अग्नी आहेच कशावरून, असे कोणी विचारल्यास त्याला सांगावयाचे, ''महाशय, पलीकडच्या खोलीत टी. व्ही. वर क्रिकेटची मॅच चालू आहे. तेथे जाऊन आपण ती पहात बसा.''

म्हणून स्वतःप्रामाण्याचा प्रश्न उरतो तो केवळ प्रत्यक्ष प्रमाणाने उपलब्ध होणाऱ्या ज्ञानाबाबत. या ठिकाणी मला वाटते की स्वतः प्रामाण्यवाद्यांचा प्रश्न बरोबर आहे. इंद्रियांनी जे ज्ञान मिळते ते खरे की खोटे असे विचारण्याचा मतलब काय ? इंद्रियांनी यथार्थ ज्ञान द्यावयाचे नाही तर आणखी दुसरे काय करावयाचे? बाह्य वस्तूंचे यथार्थ ज्ञान इंद्रियांकडून येणार नसेल तर आणखी येणार तरी कोठून? किंबहूना, व्याख्याच अशी करावी लागेल की जे इंद्रियांकडून मिळते ते आणि तेवढेच बाह्य पदार्थासंबंधीचे खरे ज्ञान होय. एरवी प्रत्यक्ष ज्ञानाच्या बाबतीत खरे ज्ञान याला काही अर्थ नाही. त्या ज्ञानाची ज्ञानबाह्य कशाशी तरी तुलना करून ते यथार्थ अथवा अयथार्थ असे ठरविता येणार नाही.

आपणाला दिसतो तो डोळा म्हणजे चक्षुरिंद्रिय नव्हे. भौतिक डोळा हा चक्षुरिंद्रियाचा केवळ Locus आहे. इंद्रिये ही अतींद्रिय असतात असे न्यायाचे म्हणणे आहे. त्यांच्या कार्यावरूनच त्यांचे अस्तित्व ओळखावयाचे. त्यांचे कार्य उपमेच्या सहाय्यानेच सांगता येते. एक तर असे म्हणावे की पदार्थांना प्रकाशित करणे हे त्यांचे कार्य आहे अथवा असे म्हणावे की पदार्थांना अंतःकरणापर्यंत

जाता यावे यासाठी इंद्रिये ही द्वारे होत. इंद्रियांमार्फत जे ज्ञान होते ते निखालस सत्य होय. हा समोरचा पदार्थ अस्तित्वात आहे आणि जो असा आहे हे जाणण्यास त्याचे प्रत्यक्ष होते एवढाच पुरावा असू शकतो. प्रत्यक्ष ज्ञान झाले पण ते खोटे ठरले असे म्हणणे विप्रतिषिद्ध आहे. ते ज्ञान incorrigible असते. स्वतःप्रमाण असते.

मग असे कसे घडते की चांदीचा तुकडा म्हणून उचलून घेतो आणि ती शिंप आहे असे ठरते, साप म्हणून दचकुन मागे सरतो आणि लक्षात येते की ही तर दोरीच आहे, वैशाखाच्या रणरणत्या उन्हात दूर माळावर झुळझुळ पाणी वाहताना दिसते पण जवळ जाऊन पहावे तो रेताड भूमीच दिसते ? आपण फसतो. पण इंद्रिये फसवतील कशी ? वस्तुस्वरूपाचे यथार्थ दर्शन करून देणे हे तर त्यांचे काम. तेच त्यांचे जीवितसर्वस्व. वस्तू जशी नाही तशी ती त्यांनी दाखवणे हे केवळ अशक्य आहे. कारण 'वस्तू अशी आहे' असे म्हणण्याचा अर्थ इंद्रिये असे दाखवितात एवढाच आहे. Esse est percipi.

या अडचणीला उत्तर असे. आपण ज्याला ज्ञान म्हणतो त्याचे स्वरूप निव्वळ बोधात्मक नसते. त्याची मुळे जीवापिंडाच्या वासनात्मकतेत असतात. एक Limiting concept या रीतीने निव्वळ, निखळ बोधस्वरूप ज्ञानाची कल्पना केली तरी त्यासाठी आधी जिज्ञासा हवी. जिज्ञासा म्हणजे ज्ञातुम् इच्छा. इच्छा हे वासनेचे एक रूप होय. इंद्रियांनी मिळणारे ज्ञान हे नागडे सत्य असते. वासनेने प्रेरित झालेली बुद्धी वासनापूर्तीसाठी त्याच्यावर वस्त्रे चढविते. शास्त्रात या वस्त्रांना विकल्प म्हणतात. नाम (द्रव्य), जाती, गुण, क्रिया हे सर्व विकल्प होत. 'हे निळे आहे' असे ज्ञान झाले तर इतरांशी तुलना करूनच त्याची 'नील' ही जाति ठरणार. तुलना करण्याचे हे काम बुद्धीचे होय; इंद्रियांचे नव्हे. तेव्हा 'हे निळे आहे' यातील निळे हा विकल्प झाला. असे सर्व विकल्प काढून टाकल्यावर जे ज्ञान उरेल तेवढेच केवल इंद्रियदत्त, Sense datum होय. त्या निर्विकल्पक ज्ञानात फसवणूक शक्य नसते. त्या ज्ञानाचे लक्षण करता येत नाही. त्याचे 'स्व'त्व हेच त्याचे लक्षण. हे स्वलक्षण ज्ञान परम सत्य असतो. पण वासनांच्या पूर्तीसाठी ज्यातून क्रिया संभवते असे बुद्धिनिर्मित ज्ञान आपण स्वीकारतो. हे ज्ञान मात्र स्वतःप्रमाण नसते.

दूर माळावर दिसणारा जलप्रवाह जर आपली तहान भागवू शकला तर

त्यातील पाणी हे खरे पाणी होय. कारण त्याला अर्थक्रियाकारित्व आहे. अर्थ म्हणजे इष्ट गोष्ट. ती प्राप्त करून घेण्यासाठी क्रिया करवून घेण्याचे सामर्थ्य त्या जलप्रवाहात आहे म्हणजे त्याला अर्थक्रियाकारित्व आहे. आपली पाणी पिण्याची प्रवृत्ती सफल झाली तरच त्या ज्ञानास अर्थक्रियाकारित्व आहे असे म्हणता येईल. ती असफल झाली तर जे प्राप्त होईल ते 'अर्थ' नव्हे; अनर्थ होय. म्हणून बुद्धिनिर्मित ज्ञानाच्या प्रामाण्यासाठी 'सफल प्रवृत्तिजनकत्व' या निकषाची गरज आहे. म्हणजे या ठिकाणी ज्ञानाचे प्रामाण्य परतः (दुसऱ्याकडून) ठरते.

येथे एक अडचण उभी केली जाते. 'माझी प्रवृत्ती सफल झाली' हे सुद्धा ज्ञानच नाही काय ? मग त्याचे प्रामाण्य नको का शाबीत करावयाला ? त्यासाठी आणखी एक निकष आणणार काय ? मग ही परंपरा संपणार कधी ?

याला उत्तर असे की स्वतःची प्रवृत्ती सफल झाली की नाही याविषयी कोणालाही शंका येत नाही. माझी तहान खरोखर भागली की नाही असा प्रश्न मी विचारू शकत नाही. साप समजून दूर पळालो, पण दोरीच आहे असे कळून जवळ येऊन निर्भयपणे उभा राहिलो. निर्भयता हे प्रवृत्तीचे साफल्य होय. मी निर्भय आहे की नाही याविषयी शंका नसते. म्हणून जे दिसले ते साप नव्हे हे ज्ञान यथार्थ होय. समुद्रकिनाऱ्यावर सायंप्रकाशात फिरताना चकचकीत असे काही दिसले. वाटले की फिरावयास आलेल्या एखाद्या पुरंध्रीच्या पायातील चांदीचे जोडवे पडलेले आहे. वर उचलले. प्रवृत्ती विफल झाली. (विफलतेविषयी शंका येत नाही.) म्हणून ते रजत होते हे ज्ञान खोटे ठरते. प्रभाकराच्या म्हणण्याप्रमाणे हे ज्ञान दुपदरी आहे. एक पदर वेदनदत्तज्ञानाचा, चकचकीतपणाच्या ज्ञानाचा आहे. त्या अंतरावरून, त्या प्रकाशात दिसणारा चकचकीतपणाचा प्रत्यय हा खराच आहे. त्याचा बाध होणारच नाही. पण त्या ज्ञानात स्मृतीचाही अंश आहे. 'रजत' ही स्मृती आहे. स्मृती म्हणून तिचा स्वीकार करण्यात काहीच वावगे नाही. 'हे रजत' यामधील 'हे' (चाकचक्य) हा अंश स्वतःप्रमाण असलेल्या प्रत्यक्ष ज्ञानाचा व रजत हा अंश (स्वतःप्रमाण असलेल्या ?) स्मृतीचा. यावर नैयायिकांचा आक्षेप असा की 'हे रजत' हे या ज्ञानात दोन ज्ञानांचे मिश्रण असून ती दोन्ही भिन्न प्रकारची आहेत असे सूचन त्या शब्दरचनेत कोठेही नाही.

पण शब्दबद्ध ज्ञान हे सविकल्पकच असते आणि विकल्प हे वासनाप्रेरित बुद्धीने निर्माण केलेले असतात आणि म्हणून त्या ज्ञानाला स्वतःप्रामाण्य नाही,

केवळ फलतः प्रामाण्य आहे, असा पक्ष घेतल्यास नैयामिकांचा आक्षेप उरत नाही. मात्र या पक्षात प्रवृत्तीच्या साफल्याचे अथवा वैफल्याचे ज्ञान स्वतःप्रमाण असते असे मानले आहे.

आता विज्ञानातील ज्ञानाच्या प्रामाण्याकडे वळू. हे ज्ञानही वासनाजन्य आहे असे मानता येईल. विज्ञानाची एक महत्त्वाची वासना असते की आजपर्यंतचे जे संचित ज्ञान आहे त्यात नवीन ज्ञान अविसंवादीपणाने अगदी फिट्ट बसावे. हे होण्यासाठी कधी कधी संचित ज्ञान थोडे तासावे लागते किंवा नवीन जमा होऊ पाहणाऱ्या ज्ञानावर थोडा रंधा मारावा लागतो. न्यूटन-आइन्स्टाईनच्या संदर्भात पहिला प्रकार घडला. अत्याधुनिक भौतिकीच्या संदर्भात दोन्ही प्रकार घडले असावेत.

विज्ञानाची वाटचाल सुरू झाल्यावर अविसंवादित्व हा निकष मानता येईल. पण विज्ञानाचा पहिला थर जमतो त्याने कुणाशी अविसंवादी असावयाचे ? त्यावेळी मानवी वासनांच्या पूर्तीला जे ज्ञान अनुकूल असते तेच प्रमाण मानावे लागेल. अर्थक्रियाकारित्व हेच प्रामाण्याचे लक्षण ठरते.

आपण आधुनिक वैद्यक, आयुर्वेद आणि होमिओपॅथी ही तीन वैद्यके लक्षात घेऊ. ही तिन्ही विज्ञानेच होत. त्यांच्या उपयोजनाने इष्टाची प्राप्ती होते यात मला तरी संशय नाही. पण त्या तिघांचा एकमेकांशी मेळ बसत नाही. त्यांच्यात अविसंवादित्व नाही. याचा उलगडा कसा करावयाचा ?

आयुर्वेदाची सुरुवात झाली तेव्हा 'वात, पित, कफ यांपैकी एखादा दोष कुपित झाला म्हणजे अस्वास्थ्य सुरू होते' या ज्ञानास अर्थक्रियाकारित्व असावे. पुढे आयुर्वेदाचा विकास झाला तो अविसंवादित्वाच्या आधाराने. जंतूमुळे रोग होतात हे आधुनिक वैद्यकाचे सुरुवातीचे ज्ञान. त्यानंतर नव्या ज्ञानाने जुन्या ज्ञानात फिट्ट बसावे अशी अट आली. असेच काहीसे होमिओपॅथीचे असणार. त्यामुळे ती तिन्ही विज्ञाने असूनही एकमेकांचा पाणउतारा करीत असतात.

आपली अशी एक समजूत आहे की विज्ञानाची आजची जी अवस्था आहे ती तशीच असणे अनिवार्य होते. कारण, विज्ञान हे वस्तुनिष्ठ असते आणि वस्तू ही एकरूपच असते. पण बुद्धिनिर्मित विकल्पांवर विज्ञान आधारित आहे ही गोष्ट लक्षात घेतल्यास आपण त्या समजुतीस घट्ट चिकटून बसणार नाही. अनेक समांतर मार्गांवर विज्ञानाची वाटचाल शक्य आहे असे वाटू लागते. सुरवात कोठे

झाली यावर पुढील गोष्टी अवलंबून असतात. दशमान पद्धतीऐवजी सप्तमान-पद्धती आपण स्वीकारली असती तर अंकगणित किती तरी निराळे झाले असते.

बुद्धी वासना-प्रेरित असते, ती विकल्प निर्माण करते व त्या विकल्पांना स्वलक्षण ज्ञानावर पांघरते असा बौद्धांचा दृष्टिकोण येथे स्वीकारला आहे. पण अंतःकरण जर निर्वासन केले तर जे ज्ञान होईल ते निव्वळ बोधात्मक असेल, स्वलक्षणांचे असेल. 'स्वलक्षणांचे' असा बहुवचनी प्रयोग मी केला. तो चुकीचा आहे. हे एक स्वलक्षण आणि हे दुसरे स्वलक्षण असे मानीत गेलो तर ते बुद्धिग्रस्त होईल. ते कल्पनापोढ पाहिजे. म्हणजे स्वलक्षण हा एकवचनी प्रयोग अधिक रास्त होईल. पण हे जे ज्ञान असेल त्यात 'मी' असेल काय ? नसेल. 'मी' हा वासनांचा एक जुडगा आहे. अंतःकरण निर्वासन केल्यावर तो विरघळून गेला. केवळ स्वलक्षण उरले. 'तत्' उरले. (तू संपलास. 'तत् त्वम् असि' हा बोलण्याचा एक उपचार आहे.) घटपटांच्या ज्ञानाग्नीचा वणवा विझल्यावर जे नुसते तत् उरते त्याला, त्या अनुभवाला, निर्वाण म्हणावयाचे. पण 'अनुभव' याच्यावर भर द्यावयाचा असेल तर ब्रह्म म्हणावयाचे.

२१, आयडीअल सोसायटी, **श्रीनिवास दीक्षित**
सागरमाळ,
कोल्हापूर ४१६००८

## 'परामर्श'ने प्रकाशित केलेले अधिवेशन विशेषांक

☆ मुंबई अधिवेशन विशेषांक :

परामर्श, खंड १०, अंक २, ऑगस्ट १९८८

☆ लातूर अधिवेशन विशेषांक : (प्रती संपल्या)

परामर्श, खंड ११, अंक ३, नोव्हें १९८९

☆ अमळनेर अधिवेशन विशेषांक :

परामर्श, खंड ११, अंक ४, फेब्रु. १९९०

☆ पालघर अधिवेशन विशेषांक :

परामर्श, खंड १३, अंक ३, नोव्हें. १९९३

☆ अहमदनगर अधिवेशन विशेषांक :

परामर्श, खंड १४, अंक ४, फेब्रु. १९९३

☆ वारणानगर अधिवेशन विशेषांक :

परामर्श, खंड १५, अंक ४, फेब्रु. १९९४

☆ पुणे अधिवेशन विशेषांक :

परामर्श, खंड १७, अंक १, मे १९९५

☆ गोवा अधिवेशन विशेषांक :

परामर्श, खंड १७, अंक ४, फेब्रु. १९९६

☆ कोपरगाव अधिवेशन विशेषांक :

परामर्श, खंड १८, अंक २, ऑगस्ट १९९६

**वरील सर्व विशेषांकांची किंमत प्रत्येकी २०/-रु.**

***टपालखर्च निराळा***

**विशेषांकांसाठी लिहा :** **संपादक, परामर्श.
तत्त्वज्ञान विभाग,
पुणे विद्यापीठ,
पुणे४११००७**